# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## कुलसचिव यांचे कार्यालय

एम.आय.डि.सी. रोडकॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५


जावक क्रमांक/गो.वि./कु.स.का./ ९५०२ /२०२१ दिनांक २०/१०/२०२१ २२

## परीपत्रक

**विषय – केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली, यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन 2021-22 च्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ – मा. सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्र. उशिनाग/शिष्यवृत्ती/दिव्यांगजन/5234/2021 दिनांक 14/09/2021

उपरोक्त मा.सहसंचालक कार्यालयाचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने विषयांकीत बाबतीत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थीक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते.

सन 2021-22 मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजुरीचे शिष्यवृत्ती (Fresh) आणि नूतनिकरणाचे (Renewal) अर्ज (Online) पध्दतीने NSP पोर्टलवरून मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परीस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नविन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नविन (Fresh) 1879 संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्तीसाठी पोस्ट मॅट्रीक डिप्लोमा/सर्टीफिकेट पदवी, पदव्युत्तर डीग्री/डिप्लोमा तसेच डिप्लोमा सर्टीफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. केंद्रशासनामार्फत नविन शिष्यवृत्तीसाठी व नूतनिकरणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत **दिनांक 30 नोव्हेंबर 2021** अशी निर्धारित करण्यात आलेली असून महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक 15.12.2021 ही आहे.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन 2021-22 साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल व अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व SOP (Standard Operating Procedure) ची सविस्तर माहीती www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे, त्या प्रमाणे महाविद्यालयांनी कार्यवाही घ्यावी.

सोबत – संदर्भीय पत्र

22/10/2021

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी –

1. मा.कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2. मा. प्र-कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3. मा.वित्त् व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
4. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
5. पदव्युत्त्र शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
6. संगणक प्रमुख सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थ्ळावर अपलोड करावे.

(डॉ. हेमंत के. बारसागडे)
उपकुलसचिव (विद्या विभाग)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712-2554210


क्रं.उशिनाग/शिष्यवृत्ती/ दिव्यांगजन/५२३८/२०२१ दिनांक १४/०९/२०२१

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण, सदर, नागपूर
६. संचालक, शासकीय/सर्व प्राचार्य अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ च्या अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ :- १) संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-/शिष्य/दिव्यांगजन/२०२१-२२/१००४७ दिनांक ०८.०९.२०२१**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नवीन मंजूरीचे शिष्यवृत्ती (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज (Online) पध्दतीने एनएसपी पोर्टलवरून मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११ वी, १२ वी, पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा/ सर्टिफिकेट पदवी, पदव्युत्तर डीग्री/ डिप्लोमा तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी, व १२ वी ची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातुन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी भरण्यासाठी पात्र आहेत.

- <u>नविन मंजूरी आणि नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-</u>

१) दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नुतनीकरणासाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३०.११.२०२१ ही आहे. महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५.१२.२०२१ हा आहे.

३) ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करून अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करून अर्ज भरावा.

४) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

५) विद्यार्थ्यांचा बँक खाते चालु स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

६) विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

७) खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास/ न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.

८) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९) ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरून, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/ संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घ्यावा.

- <u>विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेसाठी सूचना :-</u>

१) NSP पोर्टलद्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय/ संस्था यांची (KYC करण्याबाबतची प्रक्रिया NSP Portal च्या Home Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबतची प्रक्रिया याची सविस्तर माहिती www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

२) विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh ) किंवा नुतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रावरून अर्जाची छाननी करून ऑनलाईन मंजूरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करून ठेवण्यात यावी.

३) महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आयडी व पासवर्ड वापरून विहीत केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (Standard Operating Procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे.

(डॉ. संजय ठाकरे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे-१ यांचे माहितीस्तव सविनय सादर